**शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**

**||| विद्याधनं सर्वधन् प्रधानम्**

**|||**

**दि. महाराष्ट्र एज्युकेशन अॅन्ड स्पोर्टस् अकॅडमी चंदगड**

# महादेवराव बी.एड्. कॉलेज, तुर्केवाडी

# ता. चंदगड, जि. कोल्हापूर

# सन 2024 -2025

# Best Practices

**उपक्रमाचे नाव**

# प्लॅस्टिक मुक्त परिसर व स्वच्छता मोहीम



# उपक्रमाचे नाव : प्लॅस्टिक मुक्त परिसर व स्वच्छता मोहीम

प्लॅस्टिकच्या अतिवापरामुळे प्रदूषणाचे खूप मोठे संकट मानवापुढे आज उभे राहिलेले आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागामध्ये प्लॅस्टिक कचऱ्याचे ढीग अस्ताव्यस्त पसरलेले आपणास पहावयास मिळतात. त्यामुळे केवळ मानवच नाही तर प्राणी, पक्षी, वनस्पती यांचेही जीवन संकटमय बनलेले दिसून येते. त्यामुळे प्लॅस्टिकचे धोके ओळखून शासकीय पातळीवर बरेच उपाय योजले जातात पण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी खूप कमी होताना दिसते. त्यामुळे स्थानिक पातळीवर प्लॅस्टिक मुक्त परिसर व स्वच्छता मोहिमेबाबत काम हाती घेणे व जनजागृती करणे यासाठी प्रयत्न करणे खूप गरजेचे आहेत. प्लॅस्टिक कचऱ्याचे विघटन होत नसल्यामुळे तो तसाच साठून राहतो व परिसरात दुर्गंधी पसरते, परिसरातील ओढे, नदी, नाले यातील पाणी दुषित होते, आपल्या परिसरात रोगराई पसरते, निसर्गाचे सौंदर्य नष्ट होते. त्यामुळे आमच्या महादेवराव बी. एड. कॉलेज, तुर्केवाडी येथे "प्लॅस्टिक मुक्त परिसर व स्वच्छता मोहीम" हा उपक्रम 1 डिसेंबर 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीमध्ये राबविण्यात आला.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे**

1. बी. एड. प्रशिक्षणार्थींना प्लॅस्टिक प्रदूषणाचे दुष्परिणामांची माहिती समजून देणे.
2. बी. एड. प्रशिक्षणार्थींना प्लॅस्टिक मुक्त कॉलेज परिसर व स्वच्छता उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे.
3. बी. एड. प्रशिक्षणार्थींना स्वच्छतेचे महत्व पटवून देणे.
4. बी. एड. प्रशिक्षणार्थींना शालेय आंतरवासिता कालावधीत स्वच्छता उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन देणे.

सदर उपक्रमा अंतर्गत बी. एड. प्रशिक्षाणार्थीकडून विविध कृती राबविण्यात आल्या. यामध्ये खालील प्रमाणे नियोजन करण्यात आले.

**१) प्लॅस्टिक मुक्त कॉलेज परिसर -**

या उपक्रमांतर्गत बी. एड. प्रशिक्षणार्थीना प्रथमत: प्लॅस्टिक मुक्त परिसराची गरज व महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणार्थींचे गट करून कॉलेजचा सर्व परिसरची स्वच्छता करण्यात आली. कॉलेज परिसरात निवडक ठिकाणी कचरा कुंड्या ठेवण्यात आल्या. प्रत्येक १५ दिवसांनी परिसरातील सर्व प्लॅस्टिक कचरा एकत्र करण्यात आला. कॉलेज परिसरामध्ये प्लास्टिक मुक्त परिसर जागृती घोषवाक्य फलक लावण्यात आले. कॉलेज परसारातील संस्थेच्या इतर शाखेचा विद्यार्थ्यानाही या मोहिमेत सहभागी होण्यासाठी निवेदन देण्यात आले. तसेच बी. एड. प्रशिक्षणार्थीना प्लॅस्टिक पुनावापाराबाबत माहिती मिळविण्यासाठी प्रकल्प कार्य करण्यास प्रोत्साहन देणेत आले.

**२) स्वच्छता उपक्रम:**

कॉलेज परीसरासोबातच चंदगड मधील काही महत्त्वाच्या ठिकाणी स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये चंदगड बसस्थानाकाचा परिसर दि. 29/12/2024 रोजी बी. एड. प्रशिक्षनार्थीनी स्वच्छ केला. यामध्ये घनकचरा व प्लॅस्टिक कचरा एकत्र करण्यात आला. तेथील घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाची प्रशिक्षणार्थीनी माहिती घेतली. तसेच कानडेवाडी येथील ऐत्याहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्वाचे असणारे सरसेनापती प्रतापराव गुजर यांचे स्मारक व तेथील परिसर दि. 23/12/2024 रोजी स्वच्छ करण्यात आला.

**३) शालेय आंतरवासिता अंतर्गत स्वच्छता उपक्रम:**

प्रथम वर्ष बी. एड. प्रशिक्षणार्थीचा शालेय आंतरवासिता कार्यक्रम विविध शाळेमध्ये राबवण्यात आला. प्रशिक्षणार्थीना या कार्यक्रमा अंतर्गत स्वच्छता उपक्रम राबविण्यास प्रोस्ताहन देण्यात आले. त्यानुसार राजर्षी शाहू विद्यालय शिनोळी, श्री शंकरराव शिंदे हायस्कूल हडलगे, श्री भावेश्वरी विद्यालय, नांदवडे या ठिकाणी शाळेचे विद्यार्थी व प्रशिक्षाणार्थी यांनी संत गाडगेबाबा जयंतीचे औचीत्य साधून शाळेचा परिसर व ग्राम स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. स्वच्छता मोहिमेवर आधारित घोषणा देऊन गावामध्ये जनजागृती फेरी काढण्यात आली.

**४) पोस्टर सादरीकरण:**

दिनांक २२ मार्च, २०२५ रोजी जागतिक जल दिनाचे औचित्य साधून पोस्टर सदरीकरण स्पर्धा महाविद्यालयात घेणेत आली. जेणेकरून प्रशिक्षणार्थीना प्लॅस्टिकचे दुष्परिणाम व त्यावर उपाय, पर्यावरण संवर्धन, जल दिनाचे महत्त्व या विषयावर आधारीत नावीन्यपूर्ण कल्पनांचा आविष्कार करण्याची संधी मिळेल व त्याबाबत जागृती करण्यास प्रोत्साहन मिळेल. या स्पर्धेमध्ये एकूण 25 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. संस्थेच्या इतर शाखांच्या विद्यार्थ्यांनाही सदर प्रदर्शन पाहण्यासाठी खुले करण्यात आले. विजेत्या स्पर्धांचे प्रमाणपत्रक देवून अभिनंदन करण्यात आले.

**5) पथनाट्यातून जनजागृती:**

प्लॅस्टिक प्रदूषणाबाबत स्थानिक पातळीवर जनजागृती करण्यासाठी बी. एड. प्रशिक्षणार्थीना पथनाट्य प्रभावी माध्यम असल्याचे उद्बोधन करण्यात आले त्यानुसार बी. एड. प्रशिक्षणार्थीनी प्लॅस्टिकचे दुष्परिणाम या विषयावर पथनाट्याचे सादरीकरण दिनांक 28 मार्च, 2025 रोजी तडशीनाळ या गावामध्ये सादरीकरण करून लोकजागृती करण्यात आली. प्लॅस्टिक ऐवजी कापडी पिशवी वापरण्याबाबत तेथील नागरिकांना अवाहन करण्यात आले.

आशा प्रकारे चांगल्या उद्देशावर आधारीत "प्लॅस्टिक मुक्त परिसर व स्वच्छता मोहीम " हा उपक्रम महाविद्यालयाने यशस्वीपणे राबविला. सदर उपक्रम राबविण्यासाठी संस्थाध्यक्ष श्री महादेवराव वांद्रे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. कॉलेजचे प्र. प्राचार्य श्री. एन. जे. कांबळे, प्रा. जी. जी. प्रधान , श्री. एम. आर. मुल्ला, प्रा. वाय. पी. पाटील, प्रा. श्रीम. एस. ए. पठाणे, श्रीम. एस. आर. देशपांडे यांचे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

**चंदगड परिवहन महामंडळ येथे प्लास्टिक मुक्त परिसर व स्वछता मोहीम राबवताना बी .एड . प्रशिक्षणार्थी**

**दिनांक/29-:12/2024**













## सरसेनापती प्रतापराव गुजर स्मारक कानडेवाडी येथे स्वच्छता मोहीम राबवताना बी .एड . प्रशिक्षणार्थी

**दिनांक-:20/12/2025**














# प्लॅस्टिक मुक्त कॉलेज परिसर उपक्रम राबविताना बीप्रशिक्षणार्थी .एड .














**श्रीप्रशिक्षणार्थी व शाळेचे .एड .शंकरराव शिंदे हायस्कूल हडलगे येथे स्वच्छता मोहीम राबवताना बी . विद्यार्थी**

**दि .23/03/2025**













**राजर्षी शाहू विद्यालय खुर्द येथे  स्वच्छता मोहीम राबवताना बीप्रशिक्षणार्थी व शाळेचे विद्यार्थी .एड .**

**दि .23/03/2025**











